सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९१२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७

# मुंबई धूर-उपद्रव अधिनियम, १९१२

(२० ऑगस्ट १९८६ पर्यंत सुधारलेला)

## BOMBAY ACT No. VII OF 1912

# The Bombay Smoke-Nuisances Act, 1912

*(As Modified up to 20th August 1986)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित
१९८६

[ किमत— रुपये ०·८० ]

# मुंबई धूर-उपद्रव अधिनियम, १९१२

अनुक्रमणिका

उद्देशिका.
कलमे.


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव व व्याप्ती .. .. .. .. .. | १ |
| २ | अधिनियमाची व्याप्ती आणखी वाढविण्याचा अधिकार .. .. | २ |
| ३ | व्याख्या .. .. .. .. .. .. | २ |
| ४ | आयोगाची रचना .. .. .. .. .. .. | ४ |
| ५ | निरीक्षकांची नेमणूक .. .. .. .. .. | ४ |
| ६ | निरीक्षक लोकसेवक असणे .. .. .. .. .. | ४ |
| ७ | विनिर्दिष्ट क्षेत्रात आवे किंवा भट्ट्या उभारण्यास किंवा कोक तयार करण्यास प्रतिबंध करण्याचा व शास्ती बसविण्याचा अधिकार. | ५ |
| ८ | बेकायदेशीररीत्या उभारलेले आवे किंवा भट्ट्या पाडण्याबद्दल आदेश देण्याचा अधिकार. | ६ |
| ९ | मोठ्या प्रमाणात धूर निघाल्यास शास्ती .. .. .. .. | ६ |
| ९-अ | आयोगाच्या मान्यतेशिवाय किंवा परवानगीशिवाय कोणतीही भट्टी इत्यादी उभारता वगैरे कामा नये किंवा ती वापरता कामा नये. | ६ |
| ९-ब | बेकायदेशीररीत्या उभारलेली भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे पाडून टाकण्याचा आदेश देण्याचा अधिकार. | ७ |
| १० | निरीक्षकांचे अधिकार .. .. .. .. .. | ७ |
| ११ | नियम .. .. .. .. .. .. | ८ |
| १२ | अपराधांची दखल घेणे .. .. .. .. .. | ९ |
| १२-अ | अध्यक्षाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सदस्याने आयोगाचे अधिकार वापरणे. | ९ |
| १३ | (वगळण्यात आले) .. .. .. .. .. .. | ९ |

# सन १९१२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७[1]

## (मुंबई धूर-उपद्रव अधिनियम, १९१२)

(दिनांक २७ जून १९१२)

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वये अंशतः निरसित करण्यात आला आहे :—

सन १९२० चा अधिनियम क्रमांक ८.

या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९२४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०.

सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०.

सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

*सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

[2][बृहन्मुंबईतील] भट्टयांच्या धुरापासून उद्भवणारे उपद्रव समाप्त करण्यासाठी अधिनियम करणे व तो [3][महाराष्ट्र राज्यातील] इतर क्षेत्रांना लागू करण्यासाठी तरतूद करणे याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** [2][बृहन्मुंबईतील] भट्टयांच्या धुरापासून उद्भवणारा उपद्रव समाप्त करण्यासाठी अधिनियम करणे व [3][महाराष्ट्र राज्यातील] इतर क्षेत्रांना तो लागू करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :

१. (१) या अधिनियमास, मुंबई धूर-उपद्रव अधिनियम असे म्हणावे. — संक्षिप्त नाव व व्याप्ती

(२) तो प्रथमतः [4][बृहन्मुंबईस] लागू आहे.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र १९११, भाग सात, पृष्ठ ३८३ (इंग्रजी) पहा ; प्रवर समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्र, १९१२, भाग सात, पृष्ठ ९४ पहा ; आणि परिषदेतील कार्यवाहीसाठी वरील राजपत्र, १९१२, भाग सात, पृष्ठे ४२ व २३१ पहा.

२. सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९ याचे कलम ३, दुसरी अनुसूची याद्वारे, "मुंबई शहर व बेट यातील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २ द्वारे "मुंबई इलाखा शहर" या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९, अनुसूची "ई" व सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ परंतुक याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*हा अधिनियम निरसित करण्यात आला व त्यानंतर पुन्हा तयार करण्यात आला आणि उक्त अधिनियमाचे कलम ९ व अनुसूची 'इ' सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २ अन्वये अंमलात असण्याचे चालू राहिले आहे.

**अधिनियमाची व्याप्ती आणखी वाढविण्याचा अधिकार.**

२. (१) [1][ [2][राज्य] शासनास] [3][शासकीय राजपत्रात] अधिसूचना प्रसिद्ध करून ती-द्वारे आणि [1][ [2][राज्य] [1][शासन] ठरवील अशा इतर रितीने [4][ [5][बृहन्मुंबई क्षेत्र] सोडून] [6][महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागातील] कोणत्याही विनिर्दिष्ट क्षत्रास हा अधिनियम लागू करण्याचा आपला हेतू जाहीर करता येईल.

परंतु, हा अधिनियम ज्या क्षेत्रास लागू करण्याचे योजिले असेल अशा क्षेत्रात लष्करी छावणी असेल तर [7][केंद्र सरकारची] आगाऊ मंजुरी घेतल्याशिवाय, अशा क्षेत्राच्या बाबतीत कोणतीही अधिसूचना या पोटकलमा अन्वये प्रसिद्ध करता येणार नाही.

(२) ज्या क्षेत्रास हा अधिनियम लागू करण्याचे योजिले असेल अशा क्षेत्राच्या ,कोणत्याही रहिवाशाची जर अशा रीतीने अधिनियम लागू करण्यास हरकत असेल तर, उक्त अधिसूचना [3][**शासकीय राजपत्रात**] प्रसिद्ध झाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीत त्याला [1][ [2][राज्य] शासनाकडे] आपली हरकत लेखी सादर करता येईल.

(३) उक्त कालावधी संपल्यानंतर कोणत्याही वेळी [आणि पोट-कलम (२) अन्वये सादर केलेल्या, हरकती असल्यास, त्यांचा विचार केल्यानंतर, [1][ [2][राज्य] शासनास], [3][**शासकीय राजपत्रात**] अधिसूचना प्रसिद्ध करून हा अधिनियम उक्त क्षेत्रास लागू करता येईल.

**व्याख्या.** ३. या अधिनियमात :—

(१) "भट्टी" याचा अर्थ,—

(अ) वाफेने इंजिने चालविण्यासाठी, किंवा

(ब) इतर कोणत्याही प्रयोजनासाठी :

वापरण्यात येत असलेली कोणतीही भट्टी किंवा विस्तवाची जागा असा समजावा :

---

[1] "शासन" या शब्दाऐवजी "प्रांतिक शासन" हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाव्दारे दाखल करण्यात आले.

[2] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आला.

[3] "मुंबई शासन राजपत्र" याऐवजी "शासकीय राजपत्रात" हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल करण्यात आले.

[4] "मुंबई शहर आणि बेट" या शब्दाऐवजी हे शब्द, सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ३, दुसरी अनुसूची याद्वारे दाखल करण्यात आले.

[5] "हस्तांतरीत केलेला प्रदेश [ ] खेरीज करून पुनर्रचनापूर्व मुंबई राज्यातील" याऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे दाखल करण्यात आला.

[6] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ द्वारे "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रातील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] "गव्हर्नर जनरल इन कौन्सिलची" या शब्दांऐवजी "केंद्र सरकारची" हे शब्द, भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये दाखल करण्यात आले.

परंतु, जी भट्टी किंवा विस्तवाची जागा—

(एक) प्रेते जाळण्यासाठी वापरण्यात येत असेल ;

(दोन) खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाखेरीज इतर घरगुती प्रयोजनांसाठी खाजगी घरांमध्ये वापरण्यात येत असेल.

[१] * * * * * *

ती या अधिनियमाच्या अर्थानुसार भट्टी किंवा विस्तवाची जागा आहे असे समजता कामा नये.

[२][१-अ] "धूममार्ग" किंवा "धुराडे" या संज्ञेचा अर्थ, भट्टीस सांधलेला किंवा भट्टीस जोडलेला किंवा भट्टीचाच भाग असलेला कोणताही "धूममार्ग" किंवा "धुराडे" असा समजावा ;

(२) "निरीक्षक" म्हणजे, या अधिनियमान्वये नेमलेला मुख्य निरीक्षक, धूम्र उपद्रव किंवा सहायक निरीक्षक, धूम्र उपद्रव ;

(३) "आयोग" म्हणजे, या अधिनियमाअन्वये रचना केलेला [३][महाराष्ट्र धूम्र उपद्रव आयोग];

(४) "भोगवटादार" म्हणजे, ज्या जमिनीच्या संबंधात किंवा इमारतीच्या संबंधात हा शब्द वापरला असेल त्या जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे किंवा भाड्याचा कोणताही भाग मालकाला जी कोणतीही व्यक्ती त्या त्या वेळी देईल किंवा देण्यास दायी असेल अशी व्यक्ती.

(५) "मालक" म्हणजे, —

(अ) जेव्हा ही संज्ञा भट्टी, [४][धूम्रमार्ग किंवा धुराडे] याच्या संबंधात वापरली असेल तेव्हा तीत, ती भट्टी, [४][धूममार्ग किंवा धुराडे] याचा उपयोग करणाऱ्या कोणत्याही अभिकर्त्याचा किंवा पट्टेदाराचा समावेश होतो आणि भट्टी [४][धूममार्ग किंवा धुराडे] चालविण्याच्या कामाची देखरेख करणारा कोणताही कार्यदेशक किंवा इतर व्यक्ती याचा त्यात समावेश होतो ;

(ब) ही संज्ञा कोणत्याही जागेच्या संबंधाने वापरली असेल तेव्हा, तिचा अर्थ मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८* याच्या कलम ३ मध्ये त्यास जो अर्थ दिला आहे तोच आहे असे समजावे ;

१८८८ चा मुंबई ३. आणि

(६) "दंडाधिकारी" म्हणजे, इलाखा शहर दंडाधिकारी, प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा †फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, अन्वये प्रथम वर्गाचे अधिकार वापरणारे दंडाधिकाऱ्यांचे खंडपीठ असा समजावा ;

---

१. मुंबई धूर उपद्रव (सुधारणा) अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८) याच्या कलम २ अन्वये खंड (तीन) निरसित करण्यात आला.

२. सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २(१) अन्वये खंड (१-अ) समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ४ अन्वये "महाराष्ट्र (मुंबई विभाग) धूर उपद्रव प्रतिबंधक मंडळ" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

*सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ अन्वये हे नाव "मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३)" असे बदलण्यात आले.

† आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा दोन) पहा.

आयोगाची रचना. ४. [1][ (१) राज्य शासनाने **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख करण्यासाठी व नियंत्रण ठेवण्यासाठी [2][महाराष्ट्र धूम्र उपद्रव आयोग] या नावाचा एक आयोग स्थापन केला पाहिजे.

(२) उक्त आयोगात [4][ [5][राज्य] शासनाने] नामनिर्दिष्ट केलेला अध्यक्ष व [4][ [5][राज्य] शासन] ठरवील इतके इतर सदस्य यांचा समावेश असेल.

(३) आयोगाच्या सदस्यांपैकी (अध्यक्ष सोडून) एक द्वितीयांश सदस्य [4][ [5][राज्य] शासनाकडून] नामनिर्देशित करण्यात येतील ; आणि या अधिनियमामुळे ज्या मंडळाच्या किंवा संघाच्या हितसंबंधावर परिणाम होणार असेल अशा संस्थांकडून किंवा संघांकडून [4][ [5][राज्य] शासन] निर्देशित करील अशा रीतीने व अशा कालावधीसाठी, बाकीचे सदस्य निवडले पाहिजेत ; आणि सर्व सदस्यांची नेमणूक मग ते नामनिर्दिष्ट केलेले किंवा निवडून आलेले असोत- [3][**शासकीय राजपत्रात**] जाहीर केली पाहिजे.

(४) नामनिर्दिष्ट सदस्यांची जागा नैमित्तिकरीत्या रिकामी झाल्यास, [4][ [5][राज्य] शासनाने] त्या जागी नवीन नामनिर्देशन केले पाहिजे, आणि निवडून दिलेल्या सदस्याची जागा नैमित्तिकरीत्या रिकामी झाल्यास ज्या सदस्याची जागा भरावयाची असेल त्या सदस्यास ज्या संस्थेने किंवा संघाने निवडून दिले असेल त्याच संस्थेने किंवा संघाने निवडणूक केली पाहिजे; अशा रीतीने नामनिर्दिष्ट केलेला किंवा निवडून आलेला सदस्य तो ज्या सदस्याची जागा भरून काढीत असेल त्या सदस्याने, उक्त जागा रिकामी झाली नसती तर, ज्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण केले असते तितक्या कालावधीपर्यंतच अधिकारपद धारण करील.

(५) आयोगामध्ये कोणतेही पद रिकामे आहे किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष आहे याच केवळ कारणावरून आयोगाने केलेल्या कोणत्याही कृतीबाबत आक्षेप घेता येणार नाही.

निरीक्षकांची नेमणूक. ५. (१) [4][ [5][राज्य] शासनास] [3][**शासकीय राजपत्रात**] अधिसूचना प्रसिद्ध करून मुख्य निरीक्षक, धूम्र उपद्रव व त्यांना योग्य वाटतील तितके सहायक निरीक्षक, धूम्र उपद्रव नेमता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये नेमलेला प्रत्येक सहायक निरीक्षक हा मुख्य निरीक्षकाला दुय्यम असेल आणि सर्व निरीक्षक आयोगाला दुय्यम असतील व त्याच्या नियंत्रणास अधीन असतील.

निरीक्षक लोकसेवक असणे. ६. या अधिनियमाअन्वये नेमलेला प्रत्येक निरीक्षक हा, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी [6][भारतीय दंड संहितेच्या] अर्थानुसार लोकसेवक आहे, असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

---

[1]. पोट-कलम (१) हे, महाराष्ट्र विधि अनुकलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

[2]. "महाराष्ट्र (मुंबई क्षेत्र) धूर उपद्रवाबाबत आयोग" याऐवजी हे शब्द सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ५ अन्वये दाखल करण्यात आले.

"महाराष्ट्र (मुंबई क्षेत्र) धूर उपद्रव आयोग" या नावाने संबोधल्या जाणाऱ्या आयोगाने केलेल्या कोणत्याही गोष्टीवर किंवा कोणत्याही कार्यवाहीवर (दिलेली कोणतीही परवानगी, मान्यता, प्राधिकार किंवा पूर्व मंजुरी यासह) कलम ४ च्या सुधारणेचा परिणाम होणार नाही; आणि त्या आयोगाने रीतसर केलेल्या सर्व गोष्टी व सर्व कृती या महाराष्ट्र धूर उपद्रव आयोगाने केल्या असल्याचे मानण्यात येईल (१९२१ चा महाराष्ट्र २२ कलम ८ पहा).

[3]. "मुंबई शासन राजपत्र" या शब्दांऐवजी हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल करण्यात आले.

[4]. "शासन" या शब्दांऐवजी "प्रांतिक शासन" हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल करण्यात आले.

[5]. "प्रांतिक" या शब्दांऐवजी हे शब्द विधि अनुकूलन आदेश, १९६० द्वारे दाखल करण्यात आले.

[6]. केंद्रीय अधिनियम.

७. (१) [1][ [2][राज्य] शासनास] [3]**[शासकीय राजपत्रात]** अधिसूचना प्रसिद्ध करून [4][एकतर विनिर्दिष्ट बिनशर्त किंवा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून आणि अशा क्षेत्रात]— क्षत्रांत आवे किंवा भट्टया उभारण्यास किंवा कोक तयार करण्यास प्रतिबंध करण्याचा व शास्ती बसविण्याचा अधिकार.

(अ) विटांचे, कौलांचे किंवा चुन्याचे आवे उभारण्यास.

(ब) धातुक किंवा खनिज पदार्थ भाजण्यासाठी किंवा गाळण्यासाठी किंवा लोखंडाचे किंवा इतर धातूंचे ओतीव काम करण्यासाठी किंवा घडीव काम करण्यासाठी किंवा त्याचे पत्रे करण्यासाठी किंवा पिग् आयर्नचे रॉट-आयर्नमध्ये रुपांतर करण्यासाठी उपयोगात आणावयाच्या भट्टया [5][उभारण्यास किंवा त्या पुन्हा उभारण्यास किंवा त्यात वाढ किंवा फेरफार करण्यास,] अथवा

(क) ओव्हनमध्ये किंवा विशेष उपयंत्रांनी कोक तयार करण्यास, अथवा

(ड) ओव्हन शिवाय किंवा विशेष उपयंत्राशिवाय कोक तयार करण्यास,

मनाई करता येईल:

१८८८ चा मुंबई ३. परंतु अशी अधिसूचना काढण्यापूर्वी, मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८ याच्या कलम ३९४ च्या तरतुदींअन्वये नगरपालिका आयुक्ताने खंड (अ) व (ब) मध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी वापरावयाची भट्टी, उभारण्यास लायसन्स मंजूर केले असेल तेव्हा, अशी अधिसूचना ही, [6][अशा भट्टीस, जोवर ती पुन्हा उभारली जात नाही किंवा तीमध्ये फेरफार किंवा वाढ केली जात नाही] तोवर लागू होणार नाही.

(२) पोट-कलम (१) खंड (अ) किंवा (ब) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेचे उल्लंघन करून [7][जर कोणतीही भट्टी उभारण्यात आली, पुन्हा उभारण्यात आली, तीमध्ये फेरफार किंवा वाढ करण्यात आली किंवा आवा उभारण्यात आला तर तिचा/त्याचा मालक दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(३) कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) खंड (क) अन्वयें काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेचे उल्लंघन करून कोक तयार केल्यास, ती, पहिल्या अपराधसिध्दीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या व नंतरच्या अपराधसिध्दीनंतर पांचशे रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(४) कोणत्याही व्यक्तीने, पोट-कलम (१) खंड (ड) अन्वयें काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेचे उल्लंघन करून कोक तयार केल्यास ती, पहिल्या अपराधसिध्दीनंतर पंचवीस रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या व त्यानंतरच्या अपराधसिद्धीनंतर पन्नास रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(५) जर कोणत्याही इमारतीत किंवा जागेत, पोट-कलम (१) खंड (ड) अन्वये काढलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून कोणताही कोक तयार करण्यात आला तर अशा इमारतीचा किंवा जागेचा मालक किंवा भोगवटादार पहिल्या अपराधसिद्धीनंतर, पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या व नंतरच्या कोणत्याही अपराधसिद्धीनंतर पन्नास रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

---

१. "शासन" या शब्दाऐवजी "प्रांतिक शासन" हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशा द्वारे दाखल करण्यात आले.

२. "प्रांतिक" या शब्दाऐवजी हे शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आले.

३. "मुंबई शासन राजपत्र" या शब्दाऐवजी हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल करण्यात आले.

४. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम २ (१) द्वारे "कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाद्वारे "उभारण्यास" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

६. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम २ द्वारे "अशा भट्टीस किंवा आव्यास" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

७. वरील अधिनियमाच्या कलम २ (२) द्वारे "जर कोणतीही भट्टी किंवा आवा उभारण्यात आला तर" याएवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(६) पोट-कलम (१) खंड (ड) अन्वये काढलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून जेव्हा कोणत्याही कोळशाचा कोक तयार करण्याची प्रक्रिया चालली असेल किंवा कोक केला असेल तेव्हा निरीक्षकास असा कोळसा किंवा कोक अधिग्रहीत करता येईल व त्याचे अधिग्रहण केल्याचा अहवाल दंडाधिकाऱ्यास देता येईल आणि दंडाधिकाऱ्यास त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, असा कोक किंवा कोळसा सरकारजमा करण्याचा व कलम ११ अन्वये याबाबत [1][ [3][राज्य] शासन] जे नियम करील त्या नियमांस अनुसरुन, ते विकण्याचा आदेश देता येईल.

बेकायदेशीर-रीत्या उभारलेले आवे किंवा भट्टचा पाडण्याबद्दल आदेश देण्याचा अधिकार.

८. (१) कलम ७, पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीवर दंड बसविणाऱ्या दंडाधिकाऱ्यास आदेशाद्वारे अशा व्यक्तीस अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत तो आवा किंवा ती भट्टी पाडण्यासंबंधी निर्देश देता येईल.

(२) अशा कोणत्याही आदेशात विहित केलेल्या कालावधीच्या आत किंवा दंडाधिकाऱ्याने कोणतीही कारणे नमूद करून आणखी जो कालावधी दिला असेल त्या कालावधीत, कोणताही आवा किंवा भट्टी पाडण्यात कसूर करील अशी कोणतीही व्यक्ती त्यानंतर असे कसूर करणे चालू राहील त्या काला-वधीत, दर दिवसाला वीस रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

मोठ्या प्रमाणात धूर निघाल्यास शास्ती.

९. (१) जर कोणत्याही भट्टीतून या अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांनी परवानगी दिली असेल त्याहून अधिक दाट किंवा कमी उंचीवर किंवा अधिक वेळपर्यंत धूर निघेल तर भट्टीचा मालक, [3][पहिल्या वेळेच्या अपराधसिद्धीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या व त्यानंतरच्या अपराध-सिद्धीनंतर पाचशे रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(२) जी भट्टी—

(अ) विटा, कौले, किंवा चुन्याचा आवा या संबंधाने, अथवा

(ब) कलम ७ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ड) मध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनासाठी, वापरात आणली जात असेल,

अशा भट्टीस पोट-कलम (१) लागू होणार नाही.

आयोगाच्या मान्यतेशिवाय किंवा परवानगी-शिवाय कोणतीही भट्टी इत्यादी उभारता वगैरे कामा नये किंवा ती वापरता कामा नये.

[4][९-अ. (१) (अ) आयोगाने मान्य केलेल्या आराखड्यानुसार आणि आयोगाने मान्य केलेल्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त, कोणतीही भट्टी, धूममार्ग, किंवा धुराडे उभारता कामा नये, त्यात फेरफार, वाढ करता कामा नये किंवा ते पुन्हा उभारता कामा नये.

(ब) आयोगाने आराखड्यांना मान्यता दिल्याखेरीज उभारण्यात आलेली, फेरफार करण्यात आलेली, वाढविण्यात आलेली किंवा पुन्हा उभारण्यात आलेली कोणतीही भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे कोणत्याही प्रयोजनासाठी आयोगाच्या परवानगीशिवाय, आणि अशी परवानगी ही ज्या अटी व शर्ती यांना अधीन राहून देण्यात येईल त्या अटी व शर्ती यांना अनुसरून नसेल तर, वापरता कामा नये.

(क) आयोगाने मान्यता दिलेल्या आराखड्यानुसार आणि मान्यता दिलेल्या प्रयोजनासाठी उभारलेली, फेरबदल केलेली, वाढ केलेली किंवा पुन्हा उभारलेली कोणतीही भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे दुसऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी आयोगाची पुन्हा परवानगी घेतल्याशिवाय वापरता कामा नये.

---

१. "शासन" या शब्दाऐवजी "प्रांतिक शासन" हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल करण्यात आले.

२. "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आला.

३. सन १९५६ चा मुंबई अधिनियम २९, कलम २ अन्वये " पहिल्यांदा दोषसिद्ध झाल्यानंतर पन्नास रुपय, दुसऱ्यांदा दोषसिद्ध झाल्यावर शंभर रुपये आणि त्यानंतरच्या कोणत्याही दोषसिद्धीला दोनशे रुपये " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९५३ चा मुंबई अधिनियम मांक ५५, कलम ३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(२) जर कोणतीही भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे, यथास्थिती, पोट-कलम (१) खंड (अ) च्या तरतुदींचे उल्लंघन करून उभारण्यात आले, त्यात फेरफार किंवा वाढ करण्यात आली किंवा पोट-कलम (१), खंड (ब) किंवा खंड (क) च्या तरतुदींचे उल्लंघन करून त्याचा उपयोग करण्यात आला तर, अशी भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे याचा मालक सिद्धापराध ठरल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल, आणि उक्त खंड (ब) किंवा खंड (क) चे उल्लंघन चालू राहील अशा बाबतीत, अशा पहिल्या उल्लंघनाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आल्यानंतर असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा त्याला होईल.]

[१][९-ब. (१) कलम ९-अ च्या पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीवर दंड बसविणाऱ्या दंडाधिकाऱ्यास, आदेशाद्वारे, अशा व्यक्तीस, आदेशांत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे पाडून टाकण्यासंबंधी निदेश देता येईल. बेकायदेशीर रीत्या उभारलेली भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे पाडून टाकण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

(२) अशा कोणत्याही व्यक्तीने, कोणतीही भट्टी, धूममार्ग किंवा धुराडे आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत किंवा दंडाधिकारी कारणे नमूद करून परवानगी देईल अशा अधिक कालावधीत, पाडून टाकण्यास कसूर केल्यास तो, त्यानंतर अशी कसूर चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.]

१०. (१) कोणत्याही निरीक्षकाला, मालकास, व्यवस्थापकास, अभियंत्यास किंवा प्रभारी व्यक्तीस वाजवी लेखी नोटीस दिल्यानंतर :— निरीक्षकांचे अधिकार.

(अ) ज्या इमारतीत किंवा जागेत भट्टी, [२][धूममार्ग किंवा धुराडे] असेल अशा इमारतीत किंवा जागेत कामाच्या वेळी, प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल आणि अशी भट्टी, [२][धूममार्ग किंवा धुराडे] यांची तपासणी करता येईल ;

(ब) आयोगाच्या लेखी प्राधिकारपत्राअन्वये अशी भट्टी, [२][धूममार्ग किंवा धुराडे] यांतून धूर निघण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपयोगात आणलेल्या कोणत्याही उपयंत्राचा उपयोग करता येईल व त्याची चाचणी करता येईल ;

(क) अशा इमारतीत किंवा जागेस तो भेट देईल त्यावेळी, आयोगाच्या लेखी प्राधिकारपत्राअन्वये धूर निघण्यास प्रतिबंध होण्यासाठी किंवा तो कमी निघण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा परंतु अशा इमारतीत किंवा जागेत चालत असलेल्या कामात प्रयोगांच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल त्याहून अधिक अडथळा निर्माण होणार नाही अशा कोणत्याही रीतीने अशी भट्टी [२][धूममार्ग किंवा धुराडे] प्रयोग म्हणून चालविण्यात आले पाहिजे. [३]* * * * असा निदेश देता येईल ;

(२) ज्या भट्टीच्या [२][धूममार्गाच्या किंवा धुराड्याच्या] संबंधात पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये निदेश देण्यात आला आहे अशी भट्टी, [२][धूममार्ग किंवा धुराडे] याच्या कोणत्याही मालकाने अशा निदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास तो शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

परंतु, कोणत्याही निरीक्षकास, कोणत्याही ठिकाणी कलम ७ ची पोट-कलमे (२), (३) किंवा (४) अन्वये कोणताही अपराध घडला आहे किंवा घडत आहे असे वाटण्यास कारण असेल तेव्हा त्यास अशा जागेत आगाऊ सूचनेशिवाय व आयोगाच्या लेखी प्राधिकारपत्राशिवाय, प्रवेश करता येईल.

---

[१] सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ३ द्वारे कलम ९-ब समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ (अ) द्वारे 'धूमनलिका व धुराडे' हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) द्वारे "किंवा ठेवण्यात आली पाहिजे" हे शब्द वगळण्यात आले.

नियम. ११. (१) [1][ [2][राज्य शासनास,] ] *[3] * * या अधिनियमाचे उद्देश अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील. असे नियम आगाऊ प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत.

(२) विशेषत: आणि पोट-कलम (१) च्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमान्वये,—

(अ) आयोगाने पार पाडावयाच्या कामकाजाचे विनियमन करता येईल ;

(ब) आयोग व निरीक्षक यांनी अनुक्रमे वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कर्तव्ये विहित करता येतील आणि उक्त अधिकार वापरणे व कर्तव्ये पार पाडणे यांचे विनियमन करता येतील ;

(क) धूराची घनता ठरविण्याच्या प्रयोजनासाठी परिमाण विहित करता येईल ;

(ड) भट्टीतून जो धूर निघेल त्याची घनता विहित करता येईल ;

(इ) ज्यावेळी भट्टीतून अशा घनतेचा धूर निघण्यास हरकत नाही, ती वेळ विहित करता येईल ;

(फ) ज्या उंचीपेक्षा कमी उंचीवर भट्टीमधून धूर निघता कामा नये ती उंची विहित करता येईल ;

[4]* * * * * *

(ह) या अधिनियमान्वये खटला दाखल करण्यापूर्वी अपराध्यांस ताकीद देण्याची कार्यपद्धती विहित करता येईल आणि अशी ताकीद देण्याच्या व खटला दाखल करण्याच्या दरम्यान निरनिराळ्या वर्गांच्या प्रकरणांच्या बाबतीत कमीत कमी किती कालावधी लोटू दिला पाहिजे ते विहित करता येईल ;

[5][ (हह) कलम ९-अ च्या पोट-कलम (१) अन्वये आराखडा सादर करण्याबाबत व त्याच्या मान्यतेबाबत कार्यपद्धती विहित करता येईल ; ]

(आय) आयोगाच्या सभेला हजर राहणाऱ्या प्रत्येक किंवा कोणत्याही सदस्याला द्यावयाच्या फी ची रक्कम ठरविता येईल ;

(जे) कलम ७ च्या पोट-कलम (६) अन्वये सरकारजमा केलेल्या कोकच्या किंवा कोळशाच्या विक्रीबाबत व उक्त विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याबाबत कार्यपध्दती विहित करता येईल ;

(३) या कलमान्वये करावयाच्या योजलेल्या नियमांच्या मसुद्यांचा विचार ज्या तारखेनंतर करण्यात येईल अशी जी तारीख मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, च्या कलम २४, खंड (क) अनुसार विनिर्दिष्ट करावयाची असेल ती तारीख, योजिलेल्या नियमांचा मसुदा ज्या तारखेस सर्वसामान्य माहिती-साठी प्रसिद्ध केला जाईल त्या तारखेपासून तीन महिन्याहून आधीची असता कामा नये. १९०४ चा मुंबई १.

(४) या अधिनियमान्वये करावयाचा कोणताही नियम, पोट-कलम (१) अन्वये लोकांच्या अभिप्रायासाठी प्रसिद्ध करण्यापूर्वी कलम ४ अन्वये रचना केलेल्या आयोगाकडे पाठविला पाहिजे. आणि योजिलेला नियम करण्याच्या इष्टतेबाबत आणि त्याच्या तरतुदींच्या अनुरुपतेबाबत उक्त आयोगाकडून कळण्यापूर्वी प्रसिद्ध करता कामा नये.

---

[1] 'शासन' याऐवजी 'प्रांतिक शासन' हे शब्द भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल करण्यात आले.

[2] 'प्रांतिक' या ऐवजी हे शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आले.

[3] मुंबई धूम्र उपद्रव (सुधारणा) अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम ८) कलम ३ द्वारे 'गव्हर्नर जनरल इन कौन्सिल' यांच्या पूर्व मंजूरीने आणि' हा मजकूर निरसित करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे खंड (ग) वगळण्यात आला.

[5] सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ५ द्वारे खंड (हह) समाविष्ट करण्यात आला.

[१][ (५) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यावर शक्य होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी ठेवले पाहिजेत, आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारांस अधीन राहून ते **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केले पाहिजेत.]

अपराधांची दखल घेणे.

१२. दंडाधिकाऱ्यास,—

(अ) [२][ राज्य शासनाने, याबाबतीत विशेषरीत्या अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने किंवा निरीक्षकाने, प्रत्येक बाबतीत [३][ * * आयोगाच्या किंवा आयोगाने नेमणूक केलेल्या उपसमितीच्या] पूर्व मान्यतेने] केलेल्या तक्रारीवरूनच फक्त, आणि

[४][ (ब) अभिकथित अपराध घडल्याचे निरीक्षकाला कळल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीतच फक्त]

या अधिनियमाविरूद्ध असलेल्या अपराधाची दखल घेता येईल.

अध्यक्षाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सदस्याने आयोगाचे अधिकार वापरणे.

[५][**१२-अ.** (१) आयोगाच्या अध्यक्षास किंवा तो आजारी असताना किंवा मुंबईत तो गैरहजर असताना त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सदस्यास, कलमे ९-अ, १० व १२ अन्वयेचे आयोगाचे अधिकार वापरता येतील.

(२) अध्यक्षाने किंवा पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या सदस्याने आयोगाच्या पुढील सर्वसाधारण सभेच्यापूर्वी, कलमे ९-अ, १० व १२ खालील अधिकार वापरून त्याने केलेल्या कोणत्याही कृतीचा अहवाल आयोगाला दिला पाहिजे.]

१३. (दंडाच्या रकमेचा विनियोग) भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये वगळण्यात आले.

---

१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ६ अन्वये पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

२. "आगाऊ मंजूरी घेऊन एखाद्या निरीक्षकाने केलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये दाखल करण्यात आला.

३. "किंवा मुख्य निरीक्षकाच्या लेखी प्राधिकाराने" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९२४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये दाखल करण्यात आला.

४. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ४ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

५. सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये कलम १२-अ समाविष्ट करण्यात आले.

ग्रामुना—ए-७५३—संभासंमुं—९-८६—२,२३५—पीसी४*

[1][ (५) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यावर शक्य होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी ठेवले पाहिजेत, आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारांस अधीन राहून ते **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केले पाहिजेत.]

**१२.** दंडाधिकाऱ्यास,— अपराधांची दखल घेणे.

(अ) [2][ राज्य शासनाने, याबाबतीत विशेषरीत्या अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने किंवा निरीक्षकाने, प्रत्येक बाबतीत [3][ * * आयोगाच्या किंवा आयोगाने नेमणूक केलेल्या उपसमितीच्या] पूर्व मान्यतेने] केलेल्या तक्रारीवरूनच फक्त, आणि

[4][ (ब) अभिकथित अपराध घडल्याचे निरीक्षकाला कळल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीतच फक्त]

या अधिनियमाविरुद्ध असलेल्या अपराधाची दखल घेता येईल.

[5][**१२-अ.** (१) आयोगाच्या अध्यक्षास किंवा तो आजारी असताना किंवा मुंबईत तो गैरहजर असताना त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सदस्यास, कलमे ९-अ, १० व १२ अन्वयेचे आयोगाचे अधिकार वापरता येतील. अध्यक्षाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सदस्याने आयोगाचे अधिकार वापरणे.

(२) अध्यक्षाने किंवा पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या सदस्याने आयोगाच्या पुढील सर्वसाधारण सभेच्यापूर्वी, कलमे ९-अ, १० व १२ खालील अधिकार वापरून त्याने केलेल्या कोणत्याही कृतीचा अहवाल आयोगाला दिला पाहिजे.]

**१३.** (दंडाच्या रकमेचा विनियोग) भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये वगळण्यात आले.

---

१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ६ अन्वये पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

२. "आगाऊ मंजूरी घेऊन एखाद्या निरीक्षकाने केलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये दाखल करण्यात आला.

३. "किंवा मुख्य निरीक्षकाच्या लेखी प्राधिकाराने" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९२४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये दाखल करण्यात आला.

४. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ४ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

५. सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये कलम १२-अ समाविष्ट करण्यात आले.

शामुना—ए-७५३—संभासंमुं—९-८६—२,२३५—पीसी४*